आपत्काळातील संजीवनी : बिंदूदाबन – खंड २

# नेहमीच्या विकारांवर बिंदूदाबन उपचार

## ताप, बद्धकोष्ठता आदी ८०हून अधिक विकारांवर उपयुक्त !

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्‌घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**



# सनातन संस्था


**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ६८, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**नोव्हेंबर २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९८ लाख प्रती प्रसिद्ध !**

# 卐 सनातनची गुरुपरंपरा 卐



**प.पू. भक्तराज महाराज, इंदूर, मध्यप्रदेश.**

डॉ. आठवले यांचे गुरु आणि सनातन संस्थेचे श्रद्धास्थान



**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले**

सनातन संस्थेचे संस्थापक



**श्रीसत्‌शक्ति**

**(सौ.) बिंदा सिंगबाळ**




**श्रीचित्‌शक्ति**

**(सौ.) अंजली गाडगीळ**

(सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी)

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. 'ईश्वरप्राप्तीसाठी कला' याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. १५.११.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २१५ अन् अन्य ९२५ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – **www.Sanatan.org**)

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 卐 | **मनोगत** | ७ |
| १. | बिंदूदाबन उपचार परिणामकारक होण्यासाठी आवश्यक असलेले काही आध्यात्मिक गुण आणि अन्य घटक | ९ |
| २. | बिंदूदाबन उपचारांमागील मूलभूत तत्त्व | १७ |
| ३. | दाबबिंदूंचे प्रकार | १८ |
| ४. | दाबबिंदूंच्या वर्णनासंदर्भातील सूचना | २० |
| ५. | बिंदूदाबन उपचारांच्या संदर्भातील सूचना | २२ |
| ६. | सर्वसाधारण विकारांवरील दाबबिंदू | २७ |
| ७. | डोके आणि मेंदू यांच्याशी संबंधित विकारांवरील दाबबिंदू | ३० |
| ८. | डोळ्यांच्या सर्व विकारांवरील दाबबिंदू | ३५ |
| ९. | कानांच्या विकारांवरील दाबबिंदू | ३७ |
| १०. | नाकाच्या विकारांवरील दाबबिंदू | ३९ |
| ११. | घशाच्या विकारांवरील दाबबिंदू | ४४ |
| १२. | श्वसनसंस्थेच्या विकारांवरील दाबबिंदू | ४७ |
| १३. | रक्ताभिसरण संस्थेच्या विकारांवरील दाबबिंदू | ५३ |
| १४. | तोंड, हिरड्या आणि दात यांच्या सर्व विकारांवरील दाबबिंदू | ५३ |
| १५. | पचनसंस्थेच्या विकारांवरील दाबबिंदू | ५६ |
| १६. | मूत्रवहनसंस्थेच्या विकारांवरील दाबबिंदू | ६४ |
| १७. | हाडे, सांधे आणि स्नायू यांच्या विकारांवरील दाबबिंदू | ६९ |
| १८. | त्वचा आणि केस यांच्याशी संबंधित विकारांवरील दाबबिंदू | ७४ |

१९. स्त्रियांच्या विकारांवरील दाबबिंदू ७६

२०. संगणकीय सेवा करतांना होणारे त्रास आणि त्यांवरील उपचार ७७

२१. मानसिक ताणावरील दाबबिंदू ८१

२२. जुनाट विकारावरील बिंदूदाबन उपचार अधिक प्रभावी होण्यासाठी उपयुक्त दाबबिंदू ८३

२३. आरोग्य चांगले राखण्यासाठी उपयुक्त दाबबिंदू ८४

२४. असाध्य रोगांवर बिंदूदाबन उपचारांचा होणारा परिणाम ८५

२५. बिंदूदाबन उपचारांमुळे त्रास न्यून झाल्याची काही उदाहरणे ८५

२६. स्पर्शाच्या माध्यमातून उपचार करून घेतांना पंचतत्त्वांशी संबंधित अनुभूती येणे ८६

२७. ‘साधना’ म्हणून बिंदूदाबन करतांना शिकायला मिळालेली सूत्रे ८६

卐 **परात्पर गुरु डॉ. आठवले यांचा नाविन्यपूर्ण अभ्यास : प्राणशक्ती–वहन संस्थेतील अडथळ्यांमुळे होणाऱ्या विकारांवरील उपाय** ८९

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे अध्यात्मशास्त्रीय परिभाषेतील सार !** ९१

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ९३

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## मनोगत

प्रत्येकालाच आपण सदा निरोगी आणि आनंदी रहावे, असे वाटत असते; परंतु आजकाल निरोगी जीवन जगणे कठीण झाले आहे. प्रकृतीची थोडीशी कुरबूर वाटली की, आपण लगेच डॉक्टरकडे धाव घेतो. याऐवजी 'बिंदूदाबन उपचारपद्धत' अवलंबली, तर आपला वेळ आणि पैसा वाचण्यासह विकारावर मूलगामी उपचार होण्यासही साहाय्य होते. बहुतेकांना 'बिंदूदाबन उपचारपद्धत ही चीनमधून आलेली आहे', असे वाटत असते; परंतु प्रत्यक्षात तिचा उगम हिंदुस्थानातच झालेला आहे. या शास्त्राची तोंडओळख सनातनचा ग्रंथ 'शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक त्रासांच्या निवारणासाठी 'बिंदूदाबन' यात दिली आहे.

प्रस्तुत ग्रंथात डोकेदुखी, ताप आदी नेहमीच्या ८०हून अधिक विकारांवर उपचार कसे करावेत, याचे मार्गदर्शन केले आहे. याव्यतिरिक्त निरोगी रहाण्यासाठी प्रतिदिन दाबावयाचे बिंदूही या ग्रंथात सांगितले आहेत. बिंदूदाबन उपचारांसाठी मार्गदर्शक अशा महत्त्वाच्या सूचनाही आरंभी दिल्या आहेत. या सूचना समजून घेऊन बिंदूदाबन उपचार करणे आवश्यक आहे.

जीवनातील शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, आर्थिक यांसारख्या ८० टक्के समस्यांच्या मुळाशी आध्यात्मिक कारणे असतात. भूत, पिशाच यांसारख्या वाईट शक्तींचा त्रास, हे प्रधान आध्यात्मिक कारण होय. वाईट शक्तींनी आपली स्थाने मनुष्याच्या शरिरात निर्माण केलेली असल्यामुळे बिंदूदाबन उपचार करतांना त्या स्थानांवरच प्रहार होतो. याला प्रत्युत्तर म्हणून वाईट शक्तीही उपचार करणाऱ्यावर आक्रमण (हल्ला) करण्याची शक्यता असते. भावपूर्ण प्रार्थना करून एकाग्रतेने नामजप करत बिंदूदाबन उपचार करणे, हा त्यावरील मार्ग आहे.

'या ग्रंथाच्या अभ्यासाने प्रत्येकाला नेहमीच्या विकारांवर बिंदूदाबन उपचार करून निरोगी जीवन जगता येवो', ही आरोग्यदेवता भगवान धन्वन्तरीच्या चरणी प्रार्थना ! – **संकलक**